# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१.
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट ३७७-२२ दिनांक ०७/१२/२०२२

## पोलीस असल्याचे बतावणी करुन अपहरणासह पैशांची मागणी करणा-या आरोपीतांना १२ तासाचे आत गजाआड करण्यात पेल्हार गुन्हे प्रकटीकरण पथकाला यश.

पेल्हार पोलीस ठाणे हद्दित दिनांक ०४/१२/२०२२ रोजी सायंकाळी ०७.००वा. सुमारास मुंबई-अहमदाबाद महामार्ग क्रं.८ चे मुंबई वाहिनीवरील वसई ग्रिन नर्सरी जवळ, नालासोपारा फाटा, नालासोपारा(पु.), ता. वसई, जि. पालघर येथे फिर्यादी हे पायी चालत जात असतांना त्यांना दोन अनोळखी इसमांनी थांबवुन ते पोलीस असल्याचे सांगुन त्यांचेकडे २,०००/- रुपयांची मागणी करुन त्यांना जबरीने त्यांचे मोटर सायकलवर बसवुन महामार्गाने मुंबई बाजुकडे ८ ते १० कि.मी. घेवुन गेल्यानंतर ठोश्याबुक्यांनी मारहाण करुन फिर्यादी यांचे मोबाईलवरुन त्यांचे मित्र मो.इजराईल (साक्षीदार) यास फोन करुन आम्ही पोलीस असुन तुझ्या माणसाला सोडण्यासाठी २०,०००/- रुपये घेवुन सातीवली येथे ये असे सांगुन फिर्यादी यांना मारहाण केली होती. सदरबाबत फिर्यादी नामे. श्री. मोती राजेंदर राम, वय-२० वर्षे रा. डोंगरपाडा, पेल्हार गाव, नालासोपारा (पु.) यांनी दिलेल्या तक्रारीवरुन अनोळखी आरोपीतां विरुध्द पेल्हार पोलीस ठाणे येथे गु.रजि.नं. I १०३३/२०२२ भा.दं.वि.सं. कलम-३८५, ३६५, ३६४(अ), १७०, ३२३, ३४ प्रमाणे दिनांक ०५/१२/२०२२ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयाचे गांभिर्य लक्षात घेवुन वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी दिलेल्या सुचनांनुसार नमुद गुन्हयातील पाहिजे आरोपीतांचा शोध घेणेकामी पेल्हार पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेचे चार वेगवेगळे पथके तयार करुन मिळालेल्या गुप्त बातमीच्या आधारे आरोपीत यांचा शिताफिने शोध घेवुन आरोपीत नामे. १) सतिश पवार, वय-३४ वर्षे, २) योगेश अनिल घाडगे, वय-३० वर्षे, दोन्ही रा.वालीव वसई(पु.), ता.वसई यांना १२ तासाचे आत गुन्हा करण्याकरीता वापरलेल्या मोटार सायकलसह अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास सपोनि/अवघडे हे करत आहेत.

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, विरार, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली पेल्हार पोलीस ठाणेचे श्री. वसंत लब्दे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. महेंद्र शेलार, पोलीस निरीक्षक (गुन्हे) व गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोउपनि/सनिल पाटील, तुकाराम माने, तानाजी चव्हाण, प्रताप पाचुंदे, पोअं/संदिप शेळके, मोहसिन दिवाण, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, किरण आव्हाड, रोशन पुरकर, यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

----ooo----